भारत शिक्षण संस्था संचालित,

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,

## उमरगा जि. उस्मानाबाद

(संलग्नित: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित उपक्रम अहवाल

२०१९-२०२०

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

### नियमित उपक्रम अहवाल –२०१९-२०

महाविद्यालयीन युवकांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे, स्वावलंबन, सदाचार, समता, बंधुता, चारित्र्य संवर्धन, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांची रुजवण व्हावी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जावा या उदात्त हेतूने. म. गांधी व पंडित जवाहरलाल नेहरु, माजी शिक्षण मंत्री डॉ.व्ही.के.आर राव यांच्या प्रेरणा व दृष्ट्या नेतृत्वातून २४ सप्टेंबर १९६९ ला राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली.

राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वंयसेवकांना जो बिल्ला दिला जातो त्यावर मध्यभागी चाक असून त्या चाकात आठ आरे आहेत. ते चोविस तासाचे प्रतिनिधीत्व करतात. चोविस तास राष्ट्रसेवेसाठी रासेयो स्वंयसेवक तत्पर त्या मधील लाल रंग हे युवकांच्या उसळत्या रक्तांचे प्रतीक आहे व  निळा रंग आकाशाचे प्रतिनिधीत्व करतो. कार्य व कर्तृत्वआकाश मोकळे आहे असा त्यामागील अर्थ.कोणार्क येथील सूर्यमंदिराच्या रथाच्या चाकावर आधारित असलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे हे चिन्ह गतीचे प्रतीक आहे. समाजामधिल विविध समस्या, प्रश्न सोडविणूकीसाठी स्वंयसेवकान्नी सेवा वृत्तीने कार्य केले तर समाजामध्ये परिवर्तन होऊ शकते.

रासेयोचे बोधवाक्य 'नॉट मी बट यू'माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी ज्यामुले स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय मानतावाद सेवावृत्ती या मूल्यांची रूजवन स्वंयसेवकामध्ये होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरातून स्वंयसेवकामध्ये संवाद, संघटन, नेतृत्व, कौशल्य विकास,त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा या हेतूने प्रत्येक स्वंयसेवकाला विविध कार्याचे वाटप करून स्वत:ला घडण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. शिबीराच्या माध्यमातून सांयकाळी विविध सामाजिक विषयावर पथनाट्य, एकांकिका नाटक, काव्यवाचन, कथा कथन आदि सांस्कृतिक कार्यक्रमातून ग्रामीण भागांतील नागरिकांचे उद् बोधन व मनोरंजन केले जाते.आजचे महाविद्यालयीन युवक उद्याचे आधारस्तंभ आहेत. या स्वंयसेवकामधूनच उद्याचे शास्त्रज्ञ,अभियंते, शिक्षणतज्ञ, पत्रकार, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, विचारवंत, व्यावसायिक, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, वक्ते, साहित्यिक सुजाण आदर्श नागरिक निर्माण होणार आहेत. म्हणूनच राष्ट्र विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका महत्त्वाची आहे.

महाविद्यालयीनविद्यार्थ्यांनीफक्तवर्गखोल्यांमध्येच शिक्षणनघेतासमाजामध्येजाऊनप्रत्यक्षसमाजमनाचाठावघेतलापाहिजे.  समाजातीलअनेकविधप्रश्नांनासमजूनघ्यावे, महाविद्यालयीन युवकांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, स्वावलंबन, सदाचार, समता, बंधुता, चारित्र्यवर्धन, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांची रुजवण व्हावी व यासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जावा या उदात्त हेतूनेश्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने २०२०-२०या शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम राबवले. त्यामध्येउल्लेखनीय म्हणजे वृक्षारोपण, रक्तगट तपासणी, पशुचिकित्सा, स्त्रीभ्रूणहत्या अभियान, साक्षरता अभियान, मतदार जागृती, एड्स जनजागृती यात्रा, पल्स पोलिओ मोहीम, पथनाट्ये, आरोग्य शिबिरे, महिलासक्षमीकरण/ स्वावलंबन/ स्वसंरक्षण मेळावे, व्यक्तिमत्व विकासशिबीर, थोर

पुरुषांचे स्मृतिदिन/जयंती/ पुण्यतिथीईत्यादिउपक्रमांतून समाजामध्ये जाणीव जागृती करण्याचे कार्य रासेयोच्या स्वयंसेवकांनीकेले. या सर्व कृती कार्यक्रमांचा विस्तृत अहवाल पुढेसादर करीत आहे.

**वाचन दिन साजरा (१९ जून २०१९)**

भारतासारख्या भाषिक वैविध्यता असेलल्या देशामध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या, मोबाईल च्या काळात माणसे वाचानापासून दूर जात आहेत. वाचनाने, अभ्यासाने माणूस अधिक प्रगल्भ होत असतो. त्यामुळे वाचन संस्कृती पुनरुज्जीवित करणे आवश्यक आहे असे मत प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने वाचन दिन (दि. १९) साजरा करण्यात आला. केरळ राज्यात सन १९९६ पासून १९ जून हा दिवस वाचन दिन हा उपक्रम साजरा करण्यात येतो. याच धर्तीवर लोकांना वाचनाची सवय व्हावी या उद्देशाने मा. पंतप्रधान यांनी रीडिंग मिशन - २०२२ हा उपक्रम राबवण्याचे निर्देश दिलेत.

त्या अंतर्गत साहित्य वाचनाची गोडी, शासकीय योजना व उत्तुंग व्यक्तिमत्वाची ओळख विद्यार्थ्यांना ओळख व्हावी यासाठी महाविद्यालयात १९ जून या दिवशी वाचन दिनाच्या निमित्ताने लोकराज्य या महाराष्ट्र सरकारच्या मासिकाच्या प्रती विद्यार्थी व प्राध्यापकांना देऊन वाचनासाठी प्रेरित करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव हे अध्यक्षथानी होते तसेच उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. डी. वी. थोरे, रासेयो समन्वयक डॉ. विनोद देवरकर, डॉ. डी. बी. ढोबळे, डॉ. व्हि. एस. सूर्यवंशी, डॉ. के. बी. लेंगरे, डॉ. ए. एस. शिंदे, डॉ. आर. आर. नितनवरे, डॉ. पी. एल. सावंत, आदि सोबतच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६०(मुले) व९०(मुली) असे एकूण १५० स्वयंसेवक उपस्थित होते.

**आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा (२१ जून २०१९)**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यान आला.भारताच्या संस्कृतिक वारसा असलेल्या आयुर्वेद व योग यांच्या माध्यमातून मन व शरीर सुदृढ करण्यासाठी ऋषि मुनींनी त्याचा स्वीकार करून समाजात रूढ करायचा प्रयत्न केला. पण आजमितीला त्याचा आपल्याला विसर पडत चालला आहे. त्याकरिता भारत सरकारने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून घोषित करून जनसामान्यांस त्याचा उपयोग, प्रचार व प्रसार व्हावा या उदात्त हेतूने साजरा करण्याचे ठरवले. आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या प्रांगणात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी यांनी सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत योगभ्यास करून साजरा केला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही एस इंगळे (विज्ञान), डॉ एस एन अस्वले (वाणिज्य), प्रा डी व्ही थोरे (कला), प्रा बी एन गायकवाड (कनिष्ठ), एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ व्ही डी देवरकर, प्रा आर एम सूर्यवंशी, डॉ पी. एल. सावंत, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, डॉ. डी. एस. चित्तमपले,

राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६०(मुले) स्वयंसेवक उपस्थित होते.

**सामाजिक न्याय दिन साजरा (दि.२५ जून २०१९)**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे आयुष्य समाजाला एका धाग्यात बांधण्यात कारणी लावले. त्यांनी अवलंबिलेले आरक्षण व शैक्षणिक धोरण समाजहिताचे होते असे मत प्रमुख अतिथी डॉ. डी. एस. बिराजदार यांनी "छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार" या विषयावर बोलतांना व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग व इतिहास विभागाच्या वतीने आयोजित छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती दिनानिमित्त "सामाजिक न्याय दिन" व राष्ट्रमाता जिजाऊ यांची पुण्यतिथी (दि. २५) साजरी करण्यात आली. उच्च - क्षुद्र भेदभाव न ठेवता सर्वांना शिक्षणासाठी प्रेरित करणारे, नव्हे मदत करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज व स्वराज्य आणि सुराज्य उभारणीसाठी ज्ञानाचे बाळकडू शिवाजी राजे यांना पाजणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ साहेबांनी बेबंद गुलामगिरीच्या पर्वात सर्वसामान्य प्रजेचे हित जोपासण्याचे महान कार्य केले. त्यांचे उपकार आपण फेडू शकणार नाही, परंतु त्यांच्या पावन स्मृतीस केलेले अभिवादन येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे अध्यक्ष स्थानी विराजमान होते तर उपप्राचार्य उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, प्रा. डी. व्हि. थोरे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. राष्ट्रमाता जिजाऊ या फक्त आदर्श माताच नसून उत्तम शिक्षक, प्रशासक, राजनितिज्ञ, युद्ध कला निपुण होत्या. असे बहुआयामी व्यक्तिमत्व जिजाऊंचे होते. प्रयत्नवाद व बुद्धिप्रामाण्यवाद हा आजच्या महिलांनी स्वीकारायला हवा असे प्रतिपादन डॉ. जी. एन. सोमवंशी यांनी "राष्ट्रमाता जिजाऊ यांचे संस्कार व शिक्षण" यावर बोलतांना केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्रस्तावना डॉ. संजय अस्वले आणि उपप्राचार्य प्रा. धनाजी थोरे यांनी आभार व्यक्त केले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६५(मुले) व८५(मुली) असे एकूण १४० स्वयंसेवक उपस्थित होते.

**वनमहोत्सव वृक्षारोपणाने साजरा (१ ते ७ जुलै २०१९)**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाराष्ट्र सरकारच्या १३ कोटी वृक्ष लागवड व वनमहोत्सव सप्ताह (१ते७ जुलै२०१९)निमित्ते महाविद्यालयीन परिसरात तण निर्मूलन व वृक्षारोपण करण्यात आले.

अमाप व अनियंत्रित वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचे संतूलन बिघडत असुन त्याचे परिणाम आपण सर्व आता भोगत आहोत. त्यामुळे सर्व जगामध्ये पर्यावरण विषयक जनजागृती केल्या जात आहे. वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन आणि जतन करणे हि काळाची गरज झाली आहे. वृक्षसंवर्धनाशिवाय मानवाला पर्याय नाही असे मत यावेळी

प्राचार्य घनश्याम जाधव यांनी व्यक्त केले. वृक्षरोपणासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी खड्डे खोदून श्रमदान केले. यावेळी एकूण ३५वृक्षांचे रोपण करून त्यांचे जतन करण्याची जबाबदारी स्वयंसेवकांनी घेतली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही एस इंगळे (विज्ञान), डॉ एस एन अस्वले (वाणिज्य), प्रा डी व्ही थोरे (कला), प्रा बी एन गायकवाड (कनिष्ठ), एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ व्ही डी देवरकर, प्रा आर एम सूर्यवंशी, डॉ एम एस निर्मळे , प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, डॉ. डी. एस. चित्तमपले, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६५(मुले) व७०(मुली) असे एकूण १३५स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण १५०मनुष्य तास काम केले.

**कर्करोग जनजागृती अभियान : तंबाखू सोडण्याची शपथ (१९ जुलै २०१९)**

जगामधील काही असाध्य रोगांपैकी कर्करोग हा एक होय. कर्करोग होण्याची अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे तंबाखूचे सेवन आहे. कायद्याने कितीही प्रतिबंधात्मक पावले उचलली असली तरी तंबाखूची लागलेली सवय सोडण्यासाठी मनाचा निर्धार असणे आवश्यक आहे असे मत प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात जवळपास ३१०० विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तंबाखु मुक्त समाज या अभियानांतर्गत तंबाखूजन्य पदार्थ सोडण्याची शपथ घेतली. रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी यावेळी सर्वांना संबंध हेल्थ फाउंडेशन मार्फत प्रकाशित केलेल्या शपथ पत्रचे सामूहिक प्रकट वाचन केले.या वेळी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य संजय अस्वले, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्हि. जी. तडोळगे, आदि व्यासपीठावर उपस्थित होते

**हरित सेना व रेड रिबन क्लब तर्फेवृक्षारोपण (२० जुलै २०१९)**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व वनविभागाच्या सहकार्याने स्थापन केलेल्या हरितसेना महाराष्ट्र वरेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

जागतिक तापमानवाढ, हवामान व ऋतू बदल याची दाहकता अणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याचे कार्य महाराष्ट्र शासन अणि वन विभागाने हाती घेतले आहे. सर्व जगामध्ये पर्यावरण विषयक जनजागृती केल्या जात आहे. वनविभागाच्या सहाय्याने महाविद्यालयातील राष्ट्रिय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी हरितसेनेचे सदस्य झाले असून त्यांच्या वतीने महाविद्यालयीन परिसरात कडुलिंब, चिंच, करंज, वड आदिचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षरोपणासाठी राष्ट्रीय सेवा योजनाव रेड रिबन क्लब च्या स्वयंसेवकांनी खड्डे खोदून श्रमदान केले. यावेळी एकूण ५०वृक्षांचे रोपण करून त्यांचे जतन करण्याची जबाबदारी हरितसेना व रेड रिबन क्लब च्या स्वयंसेवकांनी घेतली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव, उपप्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले (वाणिज्य), प्रा. डी. व्ही. थोरे (कला), प्रा. व्ही. जे. तड़ोळगे (कनिष्ठ ) एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, डॉ. पार्वती सावंत , प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. एस. व्ही. बहिरव, डॉ. पि. एस. माने, प्रा. एस. टी. दाड़गे, प्रा. एस. एस. रेवते, प्रा. बी. ए. शेळके, प्रा. आर. आर. नितनवरे, श्री. आर. बी. सोनावणे, प्रा. आर. एम. खराडे, प्रा. एस. टी. तोड़कर, प्रा. डी. बी. ढोबळे, प्रा. सी. डी. करे यांच्यासोबतच राष्ट्रीय सेवा योजना, हरितसेना, रेड रिबन क्लब चे स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचारी अनिल तुंगे (नायक), फूलसुंदर माली, विनायक जाधव, रामराव जाधव, विलास इंगळे, तानाजी शिंदे, बालाजी शिंदे, बालाजी साठे, माधव मुगळे, शेख चाँद, शिरपा, प्रशांत वाडिकर, नरसिंग जाधव बका कांबळे आदि उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ५५(मुले) व६२(मुली) असे एकूण ११७ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २४१ मनुष्य तास काम केले.

## अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी व युवा माहिती दूत कार्यशाळा (१ ऑगस्ट २०१९)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी केली. या निमित्ताने महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.समाजकार्याचे बाळकडू राष्ट्रिय सेवा योजनेच्या कार्यक्रमातून मिळत असते . नवभारताच्या निर्मितीसाठी व सामाजिक न्यायासाठीच लोकमान्य टिळकांनी व अण्णाभाऊ साठे यांनी कार्य केले. समाजात बदल घडवायचा असेल तर स्वयंसेवकांनी स्वतः मध्ये बदल घडवला पाहिजे. स्वतःच्या व्यक्तिमत्वाची ओळख जोपर्यंत आपल्याला होणार नाही तोपर्यंत आपण जे काम करतो त्यात आपल्याला आनंद मिळणार नाही असे मत श्री मनोज सानप, जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी उस्मानाबाद यांनी युवा माहिती दूत कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथे राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने आयोजित, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून युवा माहिती दूत या शासनाच्या योजनेच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळा (दि. १ ऑगस्ट) आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटन सोहळयाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ घनश्याम जाधव होते तर प्रमुखपाहुणे श्री मनोज सानप, जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी हे होते. याप्रसंगी विचारपीठावर उपप्राचार्य व युवा माहिती दूत समन्वयक डॉ संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी, डॉ. डी. बी. ढोबळे यांची उपस्थिती होती.

या कार्यशाळेमध्ये युवा माहिती दूत हे ॲप कसे डाऊनलोड करून त्या माध्यमातून सर्वे कसा करायचा याचे सखोल मार्गदर्शन ॲड. शिंदे व श्री मुळजकर यांनी केले. तसेच डॉ. संजय अस्वले यांनी शासकीय योजना व त्याचे लाभ यावर भाष्य केले तर प्राचार्य डॉ. जी. एच. जाधव यांनी देशाच्या विकासासाठी युवकांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान महत्वाचे असे मत अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले. या कार्यशाळेस कार्यक्रमाधिकारी राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. पी. एल. सावंत, डॉ. ए. एस. शिंदे, प्रा. वैभव माने व बहुसंख्य स्वयंसेवक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. शिंदे, सूत्रसंचालन डॉ. विनोद देवरकर केले तर प्रा. डी. व्ही. थोरे यांनी आभार मानले.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी तर डॉ. डी. बी. ढोबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही. डी. देवरकर, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, डॉ. पार्वती सावंत , प्रा. डी. डी. पांढरे यांच्यासह श्रीमती डॉ. ए. एस. शिंदे, श्रीमती डॉ. आर. आर. नितनवरे, डॉ. जी. एन. सोमवंशी, डॉ. आर. एम. खराडे, डॉ. ए. डी. देशमुख, डॉ. एस. एस. रेवते,डॉ.व्ही. एस. सूर्यवंशी , डॉ. ए. के. कटके, डॉ. डी. एस. इटले, डॉ. एस. डी. गावित, डॉ. डी. एस. चित्तमपल्ले, डॉ. एस. एम. सुरवसे, डॉ. डी. व्ही. बोंदर, डॉ. ए. एस. आष्टे, डॉ. सी. डी. करे, डॉ. पि. एस. माने, डॉ. ए. एम. गाडेकर आदि प्राध्यापक, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे ८०(मुले) व९०(मुली) असे एकूण १७० स्वयंसेवक उपस्थित होते.एकूण १७० मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

**एड्स जनजागृती फेरी (१४ऑगस्ट २०१९)**

आजचा तरुण व्यसनाच्या व आजारांच्या विळख्यात अगदी सहजपणे गुंतत चालालाय. अमली पदार्थ, असुरक्षित यौन संबंध, सेल्फ मेडिकेशन यामुळे आजची तरुण पिढी विविध मानसिक व शारीरिक व्याधीच्या विळख्यात सापडली आहे. यातून त्यांची सुटका करायची असेल तर त्यांचे समुपदेशन करणे गरजेचे आहे. योग्य वेळी समुपदेशन झाले तर एड्स सारखा दुर्धर आजार सुध्दा नियंत्रित करता येईल असे मत डॉ. पंडित पुरी यांनी व्यक्त केले.

उपजिल्हा रुग्णालय, उमरगा, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय व रोटरी क्लब, उमरगा च्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून एड्स जनजागृती रॅली चे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या प्रसंगी उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. पंडित पुरी, प्राचार्य, डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य तथा आजीवन शिक्षण समन्वयक डॉ. संजय अस्वले, रोटरी क्लबचे अध्यक्ष तथा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, कॅप्टन डी. एस. चित्तमपल्ले आदि उपस्थित होते. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हारार्पण केल्यानंतर एड्स व व्यसमुक्तीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी घोषवाक्ये यांच्या गजरात भव्य रॅली ची सुरुवात झाली तर तहसील कार्यालय, उमरगा येथे आरोग्य पूर्ण जगण्याची शपथ घेऊन सांगता झाली.

आम्ही आरोग्य पूर्ण जगू व जवळच्या सर्वांचे एच आय व्हीं पासून संरक्षण करू अशी शपथ नायब तहसीलदार श्री एन. आर. मलुरकर यांनी स्वयंसेवकांना दिली. या प्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. पार्वती सावंत, समुपदेशक श्री अभय भालेराव, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. सचिन गायकवाड यांच्यासह स्वयंसेवक उपस्थित होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६०(मुले) व६०(मुली) असे एकूण १२० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २६० मनुष्य तास ज्ञान / अनुभवघेतला.

# स्वच्छता पंधरवडा (१ ते १५ ऑगस्ट २०१९)

## कृती अहवाल

**दिनांक १ ऑगस्ट२०१९**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने, स्वच्छ भारत अभियान अंर्तगत १ - १५ ऑगस्ट हा स्वच्छता पंधरवडा म्हणून साजरा करण्याच्या नियोजित कार्यक्रमांतर्गत स्वच्छता शपथ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी ग्रहण केली.

यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी सर्वांना स्वच्छता शपथ दिली. "स्वच्छता ही आपल्याला ईश्वराच्या जवळ घेऊन जाते. आपल्यात नवनिर्मिति साठी नवचैतन्य निर्माण करते. स्वच्छतेमुळे आपली ओळख, पर्यायाने गावाची, देशाची प्रतिमा उंचावण्यासाठी मदत होते" असे मत प्राचार्य डॉ घनश्याम जाधव यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता संबोधना दरम्यान व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे १०२(मुले) व १७० (मुली) असे एकूण २७२ स्वयंसेवक उपस्थित होते.त्यांनी एकूण २७२मनुष्य तास वापरले.

**दिनांक२ ते ५ ऑगस्ट२०१९**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व हरित सेनेच्या माध्यमातून परिसर स्वच्छता शिबिर यांच्या वतीने परिसरात दिनांक २ ते ५ ऑगस्ट दरम्यान सम्पन्न झाले. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता पंधरवडा कार्यक्रम अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व हरितसेना विभागाच्या सहाय्याने महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसमवेत राष्ट्रिय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी परिसर स्वच्छता कार्यशाळेत हिरीरिने भाग घेतला. यावेळी 'मन स्वच्छ तर परिसर स्वच्छ' हा मंत्र प्राचार्य डॉ घनश्याम जाधव यांनी विद्यार्थ्यांना दिला. परिसर स्वच्छतेमुळे रोगराई कमी होऊन आयुर्मान कैसे वाढते याचे मार्गदर्शन डॉ संजय अस्वले यांनी केले.

यावेळी महविद्यालयातील वर्गखोल्या, प्रयोगशाळा, सभागृह, मैदान, इत्यादीस्वच्छ करण्यात आले. यामध्ये एकूण २५० स्वयंसेवकांनी भाग नोंदविला.त्यांनी एकूण ५०० मनुष्य तास स्वच्छता कार्य केले.

**दिनांक८ ऑगस्ट२०१९**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालाच्या आजूबाजूला असलेल्या तसेच दत्तक घेतलेल्या तलमोड या गावी घरोघरी फिरून स्वच्छतेचे महत्व समजून सांगण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी पदयात्रा काढून गावकर्यांना स्वच्छतेचा संदेश दिला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे २५(मुले) व४० (मुली) असे एकूण ६५ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २६० मनुष्य तास काम केले.

**दिनांक ९ ते १० ऑगस्ट २०१९**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता पत्रके काढून स्वच्छतेची सवय रुजवण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पत्रके वाटण्यात आली. यावेळी स्वयंसेवकांनी पदयात्रा काढून गावकर्यांना स्वच्छतेचा संदेश पत्रकांच्या माध्यमातून दिला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८०(मुले) व१४० (मुली) असे एकूण २२० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ४४० मनुष्य तास काम केले.

**दिनांक ११ ते १३ऑगस्ट २०१९**

आंतरराष्ट्रीय युवा दिन हा महान तत्वज्ञानी स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिवस. पूर्ण विश्वात हा दिवस युवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. युवकांना त्यांच्या आयुष्यात प्रेरणा मिळावी यासाठी महाविद्यालयामध्येजयंती महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ. सी. डी. करे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. त्या नंतर महादेव मंदिर उमरगा या सुप्रसिद्ध पौराणिक मंदिराच्या परिसराची स्वच्छता राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक यांनी या दोन दिवसात केली.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६०(मुले) व९०(मुली) असे एकूण १५० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ३२५ मनुष्य तास काम केले.

**दिनांक १४ ते १५ ऑगस्ट२०१९**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व हरित सेनेच्या वतीने परिसरात दिनांक १४ ते १५ ऑगस्ट ला स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनीपरिसरात आधीच वृक्षारोपण कार्यक्रमात लावलेली झाडे“ एक स्वयंसेवक, एक वृक्ष संवर्धन” या कार्यक्रमांतर्गत प्रत्येकी एक झाड दत्तक घेऊन त्याच्या संगोपनाची व संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे २० (मुले) व ३० (मुली) असे एकूण ५० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ५० मनुष्य तास कार्य केले.

**विद्यापीठ वर्धापन दिन साजरा (२३ ऑगस्ट २०१९)**

एकेकाळी जगभरातून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नालंदा, तक्षशिला विद्यापीठात विद्यार्थी प्रवेश घेत असत, आज त्याच भारतातील एकही जागतिक गुणवत्ता धारक विद्यापीठांच्या पहिल्या दोनशे मध्ये भारताचे एकही विद्यापीठ नसावे हीच आपली शोकांतिका आहे. दरम्यानच्या काळात वाढलेली लोकसंख्या व उच्च शिक्षणाचा घसरलेला दर्जा हेच त्याला कारणीभूत आहे असे प्रतिपादन डॉ. सतीश कदम यांनी केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात (दि.२३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६१ वा वर्धापन दिनानिमित्त डॉ. सतीश कदम, तुळजापूर यांचे "उच्च शिक्षण - आज आणि उद्या" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे तर उपप्राचार्य

डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य धनाजी थोरे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतातील गुणवंतांना भारताबाहेर जाण्यापासून रोखता आले तर उच्चशिक्षणा वरचा विश्वास टिकून राहील असे मत डॉ. विलास इंगळे यांनी अध्यक्षीय समारोप दरम्यान व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. पद्माकर पिटले यांना संशोधन मार्गदर्शक व प्रा. पी. डी. पाटील यांना पदव्युत्तर शिक्षक म्हणून विद्यापीठाने मान्यता दिल्याबद्दल व सागर बहिरव यांचे इंग्रजी विषयातून विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. संजय अस्वले, सूत्रसंचालन डॉ. डी. बी. ढोबळे तर प्रा. डी. व्ही. थोरे यांनी आभार मानले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८२ (मुले) व२००(मुली) असे एकूण २८२ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ५६४ मनुष्य तास ज्ञान / अनुभवघेतला.

**रस्ता दुभाजकावर वृक्षारोपण: उमरग्याच्या सौंदर्यात भर (१३ सप्टेंबर २०१९)**

भयावह दुष्काळ परिस्थिती ही कायम मराठवाड्याच्या नशिबी. नैसर्गिक पावसाचा अभाव आणि त्यामुळे उद्भवलेली वनांची कमतरता. अशा परिस्थितीवर मात केली जाऊ शकते वृक्षारोपण करूनच असे मत यावेळी डॉ. उदयसिंह मोरे यांनी व्यक्त केले.

उमरगा शहर सौंदर्यीकरण कार्यक्रमाअंतर्गत दुभाजकावर फूलझाडे लावण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, हरितसेना व अजीवन शिक्षण विभागाच्या वतीने पुढाकार घेण्यात आला. फुलझाडे उपलब्ध करून त्यांच्या संगोपनाची जबाबदारी नगर परिषद, उमरगाने घेतली. यावेळी डॉ. उदयसिंह मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.स्थानिक वातावरणामध्ये वाढू शकणाऱ्या कमीत कमी पाण्यावर जगणाऱ्या झाडांची निवड करतानाच शहराच्या सौंदर्यात भर टाकणारी झाडे जर लावलीत तर आपलेही आयुष्य सुंदर होऊ शकते असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी यावेळी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. धनाजी थोरे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र सूर्यवंशी कार्यक्रमाधिकारी डॉ. पार्वती सावंत, प्रा. डी. डी. पांढरे, यांच्यासमवेत डॉ. रेश्मा नितनवरे, डॉ. आशा शिंदे, प्रा. दत्ता माने, प्रा वैभव माने, प्रा मारुती व्हणाळे व राष्ट्रीय सेवा योजनेचे बहुसंख्य स्वयंसेवक उपस्थित होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८० (मुले) व१२५(मुली) असे एकूण २०५ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ६१५ मनुष्य तास ज्ञान / अनुभवघेतला.

**शिक्षक दिन व स्वयंशासन दिन(५ सप्टेंबर २०१९)**

कवीचे संवेदनशील मन आजूबाजूला घडणाऱ्या प्रत्येक घटनेची नोंद घेत असते व ते कवितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवण्याचे कार्य कव्यासंमेलने व प्रकाशने करत असतात. विद्यार्थ्यांच्या मानसिक, शैक्षणिक जडण घडणीत अश्या उपक्रमांचा मोलाचा वाटा असतो असे प्रतिपादन काव्य संमेलनाध्यक्ष प्रा. डी. व्ही. थोरे यांनी केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वाङ•मय मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे काव्य संमेलन (दि. ५) ला महाविद्यालयात आयोजित केले होते. सर्वप्रथम महामहिम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तद्नंतर काव्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्ष उपप्राचार्य डी. व्ही. थोरे होते तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले, वाङ•मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. पी. इंगळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर आदि मान्यवर स्थानापन्न होते.

रसिकांची वाहवा मिळवणाऱ्या काव्य संमेलनात डॉ. पद्माकर पिटले यांच्या "दोन थेंब पावसाचे, डोळे पुसून गेले" या कवितेने दुष्काळाची दाहकता व कष्टकरी अगतिकता मांडली. प्रा. दत्ता माने यांनी 'विद्यार्थी माझा' या कवितेतून आजच्या विद्यार्थ्यांचे दर्शन घडविले. ते म्हणतात, "वादळी हवा, तिमिरातील दिवा। रोज घडवतो, इतिहास नवा।। विद्यार्थी माझा". प्रा. पी. एस. बनसोडे यांनी बहुजन समाजातील मागासलेपणावर आसूड ओढणारी "शिक पोरा शिक, फुले, शाहू आंबेडकरांचे विचार शिक. साळत शिक". ही कविता सादर केली. डॉ. विनोद देवरकर यांची "सोडू नकोस आता माझा हात सखे, माझी मला कळेना आता जात सखे" ही गझल रसिकांची दाद मिळवून गेली. विद्यार्थी शिक्षकांचे नाते समजावताना डॉ. चंद्रकांत पवार त्याच्या कवितेतून व्यक्त होताना म्हणतात, "मी तू पणाचे जोखंड जुगारीत.. सदवर्तनाची कास पून्हा पून्हा धरायची असते". डॉ. एस. टी. तोडकर, प्रा. ए. एम. गाडेकर, प्रा. मेघा जोशी, प्रा. अश्विनी पाकलवाड, प्रा. शालिनी जाधव, प्रा. वाघमोडे मॅडम, रोहित गायकवाड, कु. जा भालेकर, कु. समृद्धी पांगे, कु. उल्का घोडके यांनीही त्यांच्या बहारदार कवितांचे सादरीकरण केले. याप्रसंगी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे विद्यार्थी, प्राध्यापकगण व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ७६(मुले) व१२०(मुली) असे एकूण २०० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ३२०मनुष्य तास ज्ञान / अनुभवघेतला.

**मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा (१७ सप्टेंबर २०१९)**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही मराठवाडा मात्र पारतंत्र्यात होता. जुलमी, निजामी राजवटीला जनता कंटाळली होते. निजाम आणि रजाकार विरुद्ध उघड विरोधही शक्य नव्हता. अशा वेळी मराठवाड्यातील अनेक सुपुत्रांनी भूमिगत राहून स्वातंत्र्यलढ्याची ही चळवळ बळकट केली. त्यामध्ये प्रामुख्याने चंद्रशेखर बाजपेयी, देवीसिंह चव्हाण (गुरुजी), स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे आदिंचा उल्लेख क्रमप्राप्त आहे. काहींनी उघड विरोध स्वीकारून कारागृहात जाणे पसंत केले तर काहींनी भमिगत राहून मराठवाडा मुक्तीसंग्राम लढा पेटत ठेवला. त्या सर्वांना आज अभिवादन करणे हे आपले कर्तव्य आहे असे प्रतिपादन प्रा. अडसूळ यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या निमित्ताने आयोजित व्याख्यानात केला.

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त (दि.१७) ध्वजारोहणानंतर व्याख्यानाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, प्रमुखपाहुणे प्रा. एस. एन. अडसुळे, उपप्राचार्य डॉ. व्हि. एस. इंगळे, उपप्राचार्य डॉ. एस. एन अस्वले, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, प्रभारी प्राध्यापक डॉ. बी. के. लबडे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तडोळगे, प्रबंधक राजकुमार सोनवणे, आदि मान्यवर व्यासपीठावर स्थानापन्न होते.

यावेळी महाविद्यालयाच्या वतीने प्रा. डॉ. प्रवीण जवळगेकर यांचा प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांच्या हस्ते संशोधनातील सर्वोच्च पदवी, पी.एच.डी. मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

पुढे अडसुळे म्हणाले की, मुक्तिसंग्राम लढ्याची ठिणगी हे आपल्याच परिसरातून पडली असली तरीही इतिहासात त्याचा फारसा उल्लेख झालेला दिसत नाही. हिप्पर्गा गावातून पेटलेल्या या क्रांतीच्या मशालीला पेटत ठेवण्याचे कार्य उमर्ग्यातील अनेकांनी केले. प्रसंगी कारागृहात बंदिस्त झाले. बळवंत नागणे या तरुणाने तर पुण्याला जाऊन बॉम्ब तयार करण्याचे शिक्षण  घेऊन निजामाचे बारुदखाने उडविण्याचे कार्य केले. श्रीधर वर्तक यांनी अपसिंग्यात बलिदान दिले. असे अनेक दाखले त्यांनी दिले. "इतिहासाचे धडे व्यवस्थित अभ्यासले तर भविष्यकाळ शांततेत व्यतीत होईल" असे मत डॉ. घनश्याम जाधव यांनी अध्यक्षीय समारोपात व्यक्त केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन डॉ. संजय अस्वले यांनी केले तर कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापक,  शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**एस. एस. जी. ॲप द्वारे  स्वच्छतेविषयी सर्वेक्षण (२० सप्टेंबर २०१९)**

केंद्र शासनाच्या पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाच्या वतीने देशातील सर्व जिल्ह्यांचे गुणांकन ठरविण्यासाठी गुणात्मक आणि संख्यात्मक मानंकाच्या आधारे स्वच्छ सर्वेक्षण-२०१९ हा देशव्यापी सर्वेक्षणाच्या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोबाईल ॲपद्वारे ग्रामीण स्वच्छतेविषयी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन आपले मत नोंदविले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन शिक्षण विभागाच्यावतीने एस.एस.जी.- २०१९ या मोबाईल ॲपद्वारे घेण्यात येणाऱ्या सर्वेक्षणासाठी पुढाकार घेण्यात आला. भारतातील ६९८ जिल्ह्याचे प्रामुख्याने स्वच्छतेशी निगडित कामांची गुणवत्ता स्वतंत्र संस्थेमार्फत ठरवण्यात येणार आहे. या सर्वेक्षण आधारे निश्चित होणारे गुणांकन जिल्ह्याच्या गुणांकन करण्यासाठी विचारात घेतली जाणार आहे. मागील वर्षी स्वच्छतेच्या बाबतीत मराठवाडा विभागातून उस्मानाबाद जिल्हा प्रथम तर राज्यांमधून तृतीय स्थानावर होता. आपण सर्वांनी प्रतिक्रिया नोंदवून उस्मानाबाद जिल्ह्यास सर्वोच्च स्थानी पोहोचवावे असे आवाहन समन्वयक श्री ऋषिकेश डुमणे यांनी याप्रसंगी केले.

या सर्वेक्षणासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. डी. डी. पांढरे, आजीवन शिक्षण विभागाचे समन्वयक डॉ. संजय अस्वले आणि जि. प. चे श्री घंटे यांनी विद्यार्थ्यांशी समन्वय साधला.

**राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन (२४ सप्टेंबर २०२०)**

प्लास्टिक अविघटनशील आहे त्यामुळे सजीव सृष्टीला अपरिमित हानी पोहोचते. प्लास्टिक आज जरी आपल्या जीवनाचा अविभाज्य अंग बनले आहे तरी पुनर्वापर करण्यायोग्य असलेले प्लास्टिक सोडून ५० मायक्रोन पेक्षा कमी असलेल्या प्लास्टिक बॅगचा वापर स्वतःहून टाळून कापडी पिशव्यांचा वापर केला तर प्लास्टिक पासून होणाऱ्या अपरिमित हानीपासून पृथ्वीला वाचवण्यात आपलाही खारीचा वाटा असेल असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा

योजना दिनानिमित्त आयोजित प्लास्टिक मुक्त परिसर या अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ घनश्याम जाधव यांनी केले.

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिन (दि. २४) साजरा करण्यात आला. यानिमित्ताने परिसर स्वच्छता व प्लास्टिक मुक्त परिसर या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ घनश्याम जाधव यांनी मार्गदर्शन व उपप्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी ही विद्यार्थ्यांना परिसर स्वच्छतेसाठी प्रोत्साहित केले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ विनोद देवरकर, डॉ राजेंद्र सूर्यवंशी, डॉ पार्वती सावंत, डॉ आशा शिंदे, प्रा सुजित शिंदे, प्रा मारुती व्हन्हाळे व स्वयंसेवकांच्या उपस्थितीत राष्ट्रीय सेवा दिन साजरा करण्यात आला. स्वयंसेवकांनी घोषवाक्य उच्चारित विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिक कचऱ्या पासून होणाऱ्या धोक्याविषयी जनजागरण केले व परिसर स्वच्छता व प्लास्टिक कचरा गोळा करून जाळला.

या अभियानात स्वयंसेवकासमवेत महाविद्यालयातील बहुसंख्य प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ९५ (मुले) व १४० (मुली) असे एकूण २३५ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ४४० मनुष्य तास ज्ञान / अनुभवघेतला.

# स्वच्छ हि सेवा (दिनांक २४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०१९)

## कृतीअहवाल

### दिनांक २४ सप्टेंबर २०१९ (रासेयो वर्धापन दिन व स्वच्छतेचे महत्व)

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रिय सेवा योजनेच्या वतीने, स्वच्छ हि सेवा या कृती कार्यक्रमांतर्गत अंर्तगत दिनांक२४ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर२०२० हा कालावधी स्वच्छता कालावधी म्हणून साजरा करण्याचा निर्धार राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केला. य कृती कार्यक्रमाची सुरवात २४ सप्टेंबर पासून करण्यात आली.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात २४ सप्टेंबर रोजी "राष्ट्रिय सेवा योजना वर्धापन दिन" ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला.बदलते वातावरण, जागतिक लोकसंख्या वाढ, नवनवीन आजारांचे थैमान या धर्तीवर भारत सरकार ने सुरु केलेल्या "स्वच्छ ही सेवा" उपक्रमला अनन्यसाधारण महत्व आहे. जगभरात आरोग्य व स्वछता याचे याचे सम गुणोत्तर बघायला मिळते. जिथे स्वच्छता असते तिथे आरोग्य नांदते, म्हणूच "स्वच्छ हो भारत" ही कामना कृतीतून प्रत्यक्षात आणूया असे प्रतिपादन प्राचार्य डॉ जी एच जाधव यांनी यावेळी केले.

राष्ट्रिय सेवा योजना हा भारत सरकारचा स्थायी उपक्रम असून महाविद्यालये, शाळा यातून तो राबवला जातो. विद्यार्थ्याला सामाजिक भान, समाजसेवा, नेतृत्व गुण यांचे बाळकडू विद्यार्थी जीवनातच मिळावे म्हणून हा उपक्रम महत्वाची भूमिका पार पाडतो. रासेयो चे देशभरातील लाखो स्वयंसेवक स्वच्छतेच्या सेवेमधे योगदान देतील असा विश्वास डॉ विनोद देवरकर यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा डी व्ही थोरे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी तडोळगे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. पार्वती सावंत , प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी डी पांढरे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ८५(मुले) व १७५ (मुली) असे एकूण २७० स्वयंसेवक उपस्थित होते.एकूण२७० मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

**दिनांक २५ ते २७ सप्टेंबर २०१९ (वृक्ष संवर्धन व प्लास्टिक मुक्त परिसर)**

प्लास्टिक धरतीच्या, निसर्गाच्या व पर्यायाने मानवाच्या आरोग्यास हानिकारक आहे. साधारणतः ५० मायक्रोन पेक्षा जास्त जाडी असलेल्या प्लास्टिक उत्पादनाचा पुनर्वापर केल्या जाऊ शकतो. परंतु त्यापेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिकचा एकदा वापर करून ते अस्ताव्यस्त फेकून दिल्या जाते. त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावणे गरजेचे आहे असे मत प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी फिट इंडिया प्लोगिंग रन दरम्यान व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने (दि.०२) "तंदुरुस्त भारत प्लास्टिक संकलन दौड" आयोजित केली होती. यामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवकांनी सहभाग घेऊन प्लास्टिक संकलन केले.

प्लास्टिकचा सुपीक जमिनीवर त्याचा थर जमा होऊन ती नापीक होऊ शकते, जलसंधारणाची क्षमता गमावू शकते. जर सांडपाणी निचरा यंत्रणेत अडकले तर सांडपाणी रस्त्यांवर येऊन अनारोग्यस बढावा देऊ शकते. पक्षी, प्राणी यांच्या पोटात गेले तर त्यांचा जीवही जाऊ शकतो. अश्या घातक प्लास्टिक उत्पादनांची निर्मिती वर शासनाने बंदी आणलेली आहे. पण आधीच उत्पादित प्लास्टिक जमा करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे हे गरजेचे आहे. त्याकरिता भारत सरकार प्लास्टिक मुक्ती अभियान राबवत आहे. त्या अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त "फिट इंडिया प्लोगींग रन" हा उपक्रम श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन शिक्षण विभाग, राष्ट्रीय कॅडेट कॉर्पस यांनी यशस्वी पणें राबवला. या दरम्यान जमा झालेल्या प्लास्टिक कचऱ्याची खडकाळ पृष्ठभूमिवर होळी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ संजय अस्वले, प्रबंधक राजकुमार सोनवणे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. पार्वती सावंत, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. इ. बिराजदार, प्रा. एस. पी. पसरकल्ले, डॉ. पी. एस. माने, डॉ. के. बी. लेंगरे, आदींसह शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.या प्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा डी व्ही थोरे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी तडोळगे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. पार्वती सावंत , प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी डी पांढरे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० (मुले) व८० (मुली) असे एकूण १३० स्वयंसेवक उपस्थित होते.एकूण५२० मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

**दिनांक २९ सप्टेंबर २०२० (सर्जिकल स्ट्राईक दिवस)**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २९/०९/२०१९ रोजी "सर्जिकल स्ट्राईक दिवस" साजराकरण्यात आला. यावेळी"जवानांना प्रेम-आदर द्या, ते तुमच्यासाठी प्राण देतील"असे प्रतिपादन कॅप्टन सुर्यकांत जाधव यांनी केले.

सीमेवर लढणारे जवान घर-दार सोडून महिनोन्महिने उन, पाऊस, थंडी वारा यांचा मारा सहन करत सिमेपल्याड असलेल्या शत्रूपासून संरक्षण देण्याचे काम करत असतात. देश्याच्या सीमेवर कर्तव्य बजावत असतांना देशभक्ती एवढाच विचार त्यांच्या डोक्यामध्ये असतो. मृत्यूशी झुंज देत अनेक सर्जिकल स्ट्राईक, रेड, कारवाया सीमा व देश संरक्षणासाठी कराव्या लागतात. ज्याची सर्वसामान्य जनतेला कल्पनाही नसते. त्यांचे कार्य व तयाप्रती आदर निर्माण व्हावा यासाठी विद्यमान सरकारने २९ सप्टेंबर हा दिवस "सर्जिकल स्ट्राईक दिवस" साजरा करावा असे आवाहन केले. त्या निमित्ते आयोजित कार्यक्रमात कॅप्टन सुर्यकांत जाधव बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत माजी सैनिक श्री खंडू दुधभाते म्हणाले "सैनिकाला लढायची उर्जा मिळते ती तुमच्या आदरभावातून. त्याच्या कार्याचा आदर करा, गौरव करा तो तुमच्यासाठी शत्रूशी लढेल". कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव यांनी त्यांच्या अभ्यास दौऱ्यादरम्यान आलेले त्यांचे अनुभव, तिथली कठीण परिस्थिती, सैनिकांना वाटत असलेली आपुलकी याचे कथन व त्याच्या कार्याचा गौरव अध्यक्षीय समारोपात केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केले तर डॉ. पार्वती सावंत यांनी आभार मानले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे, प्रा. डी डी पांढरे व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ९०(मुले) व१००(मुली) असे एकूण १९० स्वयंसेवक उपस्थित होते. एकूण१९० मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

**दिनांक ३० सप्टेंबर ते १ ऑक्टोंबर२०१९ (स्वच्छता यात्रा व दारोदारी प्रचार)**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक ३०/९/२०१९ रोजी काळे प्लाट, उमरगा परीसरात स्वच्छता रैली काढून रस्ते, नाले, गटारींची स्वच्छता करून स्वच्छतेचे महत्व समजावून सांगीतले. यावेळी स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधीकारी यांनी परीसरात स्वच्छता ठेवण्याचे महत्व छापील पत्रिकांच्या माध्यमातून समजावून सांगण्यासाठी घरोघरी भेटी दिल्या.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. पार्वती सावंत, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. स्वच्छता यात्रेमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे ४०(मुले) व६० (मुली) असे एकूण १०० स्वयंसेवक उपस्थित होते.

**दिनांक ०२ ऑक्टोंबर २०१९ (महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती)**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २/१०/२०१९ रोजी "राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती" मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जी. एच. जाधव यांनी प्रतिमा पूजन केले व दोन्ही महापुरुषांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. धनाजी थोरे, कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. पार्वती सावंत , प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. सुजित शिंदे व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे २० (मुले) व३०(मुली) असे एकूण ५० स्वयंसेवक उपस्थित होते.एकूण५० मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

**मतदार जागृती फेरी (०५ ऑक्टोबर २०१९)**

येत्या २१ ऑक्टोबरला आपल्याला आपल्या परिसराचा विकास करू शकणाऱ्या उमेदवाराला मतदान करून लोकशाही बळकट करण्याची संधी मिळणार आहे. या संधीचे सोने करून लोकशाहीच्या या उत्सवात जास्तीत जास्त मतदारांना मतदानासाठी प्रेरित केले पाहिजे असे मत "मतदार जनजागृती रॅली" च्या समोराप प्रसंगी मास्टर ट्रेनर प्रा. शैलेश महामुनी यांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन शिक्षण विभाग, राज्यशास्त्र विभाग यां च्या संयुक्त विद्यमाने आयोजित मतदार जागृती रॅली चे आयोजन (दि.०५) करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. डी. व्ही. थोरे, उपप्राचार्य बी. एन. गायकवाड, पर्यवेक्षक व्ही. जी. तदोळगे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. पार्वती सावंत, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस. डी. शिंदे, प्रा. व्ही. एम. पाटील, प्रा. व्ही. एस. पवार, प्रा. एस. इ. बिराजदार, आदींची उपस्थिती होती. महाविद्यालयीन परिसरातून सुरवात करून तहसील कार्यालयासमोर या रॅली चा समारोप करण्यात आला. या रॅली मध्ये जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. स्वयंसेवकांच्या "मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो", "मतदान करा मतदान करा, २१ तारखेला मतदान करा", अश्या घोषणांनी परिसर दुमदुमला. यावेळी निवडणूक कार्यालयाच्या वतीने मास्टर ट्रेनर प्रा. शैलेश महामुनी, प्रा. सगर, नोडल अधिकारी प्रा. घुले यांनी उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे १०५(मुले) व१२५(मुली) असे एकूण २३०स्वयंसेवक उपस्थित होते. एकूण४६०मनुष्यतास त्यांनी ज्ञान/अनुभव घेतला.

**महात्मा फुले पुण्यतिथी (२८ नोव्हेंबर २०२०)**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २८ नोव्हेंबरला महात्मा ज्योतिबा फुलेयांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य डी. व्ही. थोरे आदिमान्यवरउपस्थित होते. स्त्रीशिक्षणाच्या पाया भरणीचे श्रेय महात्मा ज्यतीबा फुलेंना जाते.

अतिशय प्रतिकूल परिस्थिती मध्ये सावित्रीबाई यांना शिक्षणासाठी प्रेरित केले. तद्नंतर पहिली महिलासाठीची शाळा काढून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली असे प्रतिपादन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. संजय अस्वले यांनी तर आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. पार्वती सावंत यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ६० (मुले) व१५२ (मुली) असे एकूण २१२ स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण २१२ मनुष्य तास ज्ञान / अनुभवघेतला.

**जागतिक एड्स दिन (१डिसेंबर २०२०)**

आजचा तरुण व्यसनाच्या व आजारांच्या विळख्यात अगदी सहजपणे गुंतत चाललाय. अमली पदार्थ, असुरक्षित यौन संबंध, सेल्फ मेडिकेशन यामुळे आजची तरुण पिढी विविध मानसिक व शारीरिक व्याधीच्या विळख्यात सापडली आहे. यातून त्यांची सुटका करायची असेल तर त्यांचे समुपदेशन करणे गरजेचे आहे. योग्य वेळी समुपदेशन झाले तर एड्स सारखा दुर्धर आजार सुध्दा नियंत्रित करता येईल असे मत डॉ. पंडित पुरी यांनी व्यक्त केले.

उपजिल्हा रुग्णालय, उमरगा, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, विधी मंडळ, उमरगा व रोटरी क्लब, उमरगा च्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून एड्स जनजागृती रॅली चे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या प्रसंगी उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. पंडित पुरी,न्याय दंडाधिकारी एम. टी. बिलाल, न्याय दंडाधिकारी ए. डी. पाटील, डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य तथा आजीवन शिक्षण समन्वयक डॉ. संजय अस्वले, रोटरी क्लबचे अध्यक्ष तथा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर, कॅप्टन डी. एस. चित्तमपल्ले, श्री विवेक पवार, शाखाधिकारी, (एच. डी. एफ. सी.) श्री अतुल देशपांडे व श्री भीमाशंकर तोडकरी, आदि उपस्थित होते. याप्रसंगी मा. श्री. एम. टी. बिलाल व उपस्थित मान्यवरांनी रॅली ला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली.  एड्स व व्यसमुक्तीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी घोषवाक्ये यांच्या गजरात भव्य रॅली ची सुरुवात झाली.  "आम्ही आरोग्य पूर्ण जगू व जवळच्या सर्वांचे एच आय व्हीं पासून संरक्षण करू अशी शपथ नायब तहसीलदार श्री रोहन काळे यांनी स्वयंसेवकांना तहसील कार्यालय, उमरगा येथे श्री रोहन काळे, नायब तसीलदार यांनी सर्वांना दिल्यानंतर सांगता झाली.

या प्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. पार्वती सावंत, समुपदेशक श्री अभय भालेराव, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. सुजित शिंदे यांच्यासह स्वयंसेवक उपस्थित होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ९०(मुले) व१५०(मुली) असे एकूण २४० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण ६९० मनुष्य तास ज्ञान / अनुभवघेतला.

**रक्तदान शिबिराचे आयोजन (०४ डिसेंबर २०१९)**

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असे समजले जाते. रक्त दिल्यानंतर शरीरामध्ये कुठलीही कमजोरी न येता उलट शरीरातील प्रत्येक अवयव अधिक क्षमतेने कार्य करतो व दान केलेल्या रक्ताची उणीव पुढील तीन महिन्यांमध्ये शरीर भरून काढते. असे प्रतिपादन श्री अतुल देशपांडे यांनी याप्रसंगी केले.

उमरगा शहरातील एचडीएफसी बँक, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय व श्रीकृष्ण रक्तपेढी उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील योगा सेंटर मध्ये केले गेले. याप्रसंगी एचडीएफसी बँकेचे शाखाधिकारी श्री अतुल देशपांडे श्रीकृष्ण रक्तपेढीचे संचालक डॉ. दामोदर पतंगे, उपजिल्हा रुग्णालय उमरगा चे अधीक्षक डॉ. पंडित पुरी, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, श्री विवेक पवार, उपप्राचार्य प्रा. धनाजी थोरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद देवरकर, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ पार्वती सावंत, नॅशनल कॅडेट कॉर्प्सचे कॅप्टन प्रा. डी. एस.  चिटमपल्ले आदी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. दामोदर पतंगे, डॉ. पंडित पुरी यांनीही उपस्थित रक्तदात्यांना मार्गदर्शन केले व रक्तदानासाठी प्रेरित केले. या शिबिरात एकूण १७ स्वयंसेवकांनी रक्तदान केले.

हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी एचडीएफसी शाखेचे श्री भीमाशंकर तोडकरी, श्री मल्लिकार्जुन माळगे, श्री दीपक शिंदे, श्रीकृष्ण रक्तपेढीचे श्री हंचाटे व त्यांचे तांत्रिक सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन (१४ जानेवारी २०२०)**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात १४ जानेवारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिन निमित्ते राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. अनाद जाधव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य डी. व्ही. थोरे हे उपस्थित होते. नामविस्तार दिनाच्या निमित्ताने बोलतांना डॉ. आनंद जाधव म्हणाले कि विद्यार्थ्यांना प्रश्न निर्माण करणारे शिक्षण दिले गेले पाहिजे.

प्रथमतःडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी एच जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, उपप्राचार्य डॉ. एस एन अस्वले, उपप्राचार्यडी व्ही थोरे,प्रा. एस डी. गावित,सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी भूगोल दिनानिमित्ते वसुंधरेचे पूजनही करण्यात आले.या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. डी. डी. पांढरे, प्रा. एस.डी. शिंदे, प्रा. एस. टी. दाडगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय अस्वले यांनी केले तर कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर यांनी आभार मानले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ७० (मुले) व११० (मुली) असे एकूण १८० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण १८० मनुष्य तास ज्ञान / अनुभवघेतला.

**युवा सप्ताह (१२ ते १९ जानेवारी २०२०)**

युवक हा राष्ट्राच कणा असतो. त्याच्यातील उर्जेला विधायक राष्ट्रहित जोपासणाऱ्या कार्याची जोड दिली तर मोठी मोठी कामे होऊ शकतात. म्हणून या कालावधी दरम्यान स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ, एक आदर्श पुत्र तर दुसरी आदर्श माता .. यांच्या विचारांचे अमृत स्वयंसेवकांपर्यंत पोहचवण्याचे काम या दरम्यान व्याख्यानाच्या माध्यमातून करण्यात आले.शाळा व शिबिरातून ज्ञान व श्रम याचे महत्व सांगण्यात आले.

स्वयंसेवक म्हणून समाजात काम करत असतानाच सामाजिक प्रश्नांची जाण त्याला होतेच पण ते कार्य करत असताना प्रश्नांचे उत्तर शोधण्याची संधी ही त्याला मिळत असते. प्रश्नांची उकल असताना उत्तरही त्यांना मिळत आणि यामधूनच त्याची संशोधन वृत्ती वृद्धिंगत होते. देशाचे भवितव्य हे अशाच सळसळत्या रक्ताच्या तरुणांवर अवलंबून असते जे देशासाठी बौद्धिक सामाजिक आणि आर्थिक पातळीवर योगदान देणाऱ्या तरुणांची पिढी घडवण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग करत असतात.

राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे युवकांसाठी संस्कार शिबिरे असतात या शिबिराच्या माध्यमातून त्यांना श्रमसंस्कार शिकवले जातात. कोणतेही काम कमी किंवा उच्च प्रतीचे नसते याची प्रयत्नपूर्वक जाणीव करून

देण्यासाठी या शिबिरांचे आयोजन केलेले असते. विद्यार्थी हा उद्याचा नागरिक असतो. समाजातील प्रत्येक प्रश्नांबाबत संवेदनशील असलेला नागरिकच देशाचे उज्ज्वल भवितव्य घडवू शकतो.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विनोद देवरकर, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. एस डी शिंदे, प्रा. डी डी पांढरे, डॉ. पार्वती सावंत, प्रा. दिघे, प्रा. कु. भावे, प्रा सौ. जाधव, श्री मंठालकर, महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे ४० (मुले) व८०(मुली) असे एकूण १२० स्वयंसेवक उपस्थित होते. त्यांनी एकूण १२० मनुष्य तास ज्ञान / अनुभवघेतला.

# वनमहोत्सव (१ ते ७ जुलै २०१९)





**महाविद्यालयात वृक्षारोपण करून वनमहोत्सव साजरा केला गेला**





रासेयो वर्धापन दिनी दध्वजारोहण प्रसंगी उपस्थित स्वयंसेवक व प्राध्यापक





जारोहण व स्वच्छ हि सेवा यावर मार्गदर्शन करतांना प्राचार्य जी एच जाधव

# सर्जिकल स्ट्राईक दिवस/ शौर्य दिवस (२९ सप्टेंबर २०१९)





सर्जिकल स्ट्राईक दिवस - कॅप्टन सुर्यकांत जाधव मार्गदर्शन करतांना





सर्जिकल स्ट्राईक दिवस प्राचार्य डॉ. जाधव मार्गदर्शन करतांना

# दिनांक ०२ ऑक्टोंबर २०१९ (महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती)



राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

# दिनांक ०२ ऑक्टोंबर २०१९ (महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती)





स्वच्छता रैली : स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधीकारी यांनी परीसरात स्वच्छता ठेवण्याचे महत्व छापील पत्रिकांच्या माध्यमातून समजावून सांगण्यासाठी घरोघरी भेटी दिल्या.







**श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व हरित सेनेच्या माध्यमातून परिसर स्वच्छता, वृक्ष संवर्धन व प्लास्टिक मुक्त परिसर यावर कार्यशाळा**

## जागतिक अंध दिन व वाचन प्रेरणा दिन (दि. १५ ऑक्टोबर२०१९)






**जागतिक अंध दिन व वाचन प्रेरणा दिन डॉ. ए.पी.जे. कलम यांच्या प्रतिमेचे पूजन करून जीवनात वाचनाचे महत्व या विषयावर व्याख्यान आयोजित केले.**

## राष्ट्रीय एकता दिवस (दि. ३१ ऑक्टोबर २०१९)









**सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ते "राष्ट्रीय एकता दिवस"साजरा करण्यात आला**

# संविधान गौरव दिन (२६ नोव्हेंबर २०१९)





**संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान गौरव दिन साजरा केला**

# जागतिक एड्स दिन (१ डिसेंबर २०१९)





**महाविद्यालय, जिल्हा उपरुग्णालय, विधिज्ञ मंडळ, तात्याराजी मोरे कॉलेज ऑफ फार्मसी व रोटरी क्लब, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक एड्स दिनानिमित्त संयुक्त रॅली दि. १ डिसेंबर रोजी काढण्यात आली.**




# जागतिक दिव्यांग दिन (३ डिसेंबर २०१९)





आजीवन शिक्षण विभाग, मतदार साक्षर क्लब व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिव्यांग विद्यार्थी व स्टाफ यांचा "मी मतदार आहे याचा मला अभिमान आहे" संदेशासह सत्कार करण्यात आला

# महिला सबलीकरण सप्ताह (३ ते १० जानेवारी २०२०)




महिलांसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबीर

# युवा सप्ताहानिमित रक्त घटक तपासणी शिबीर (१२ ते १९ जानेवारी २०२०)





स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचार्यांसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबीर





युवा सप्तह निमित्ते व्याख्यान देतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. विनोद देवरकर

# लोकशाही पंधरवडा (दिनांक १८ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२०)





लोकशाही जपण्याची शपथ घेतांना प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी




महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी वर्ग खोल्या, गार्डन मध्ये जाऊन मतदार जनजागृती करत असतांना





स्वयंसेवकांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ते जनजागृती शोभायात्रा काढली त्याची क्षणचित्रे




मतदार दिनानिमित्ते शपथ घेतांना महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी

कार्यक्रमाधिकारी प्राचार्य